**आदेश**

जा.क्र.पोआ/ २८०२ /२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड
दिनांक १४/०४/२०२०

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक ०१/०४/२०२० चे ००/०१ ते दिनांक १४/०४/२०२० चे २४/०० वा. च्या वाहतुक मनाई आदेशाचा कालावधी वाढविलेबाबतचा आदेश.**

**२)** ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात महाराष्ट्रात ,पुणे शहरात गतीने पसरत आहे. असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९ ) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. या पार्श्वभुमीवर या कार्यालयाकडुन पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे **दिनांक ०१/०४/२०२० चे ०० :०१ ते १४/०४/२०२० चे २४ :०० वा पर्यंत जमावबंदी आदेश अंमलात आहेत.** तसेच महाराष्ट्र शासनाने संदर्भ नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक १३/०४/२०२० अन्वये अधिसुचना जारी करुन सुधारीत आदेशाव्दारे दिनांक २५/०३/२०२० रोजीचे लॉकडाऊन आदेशाची मुदत दिनांक ३०/०४/२०२० अखेर वाढविली आहे.

**३)** आपसातील परस्पर संपर्कामुळे या विषाणुचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जीविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होऊ शकते याबाबत माझी खात्री झालेली आहे. त्या अनुषंगाने सारासार विचार करून तातडीची प्रतिबंधक उपाययोजना करणेसाठी फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ मधील तरतुदींच्या अनुषंगाने अनावश्यक वाहतुक व गर्दी टाळण्यासाठी सर्व प्रकारच्या वाहतुकीस निर्बंध घालणे व मनाई करण्यासाठी स्थानिक निवासी, अभ्यागत, वारंवार विविध कामानिमित्त पिंपरी चिंचवड मध्ये प्रवेश करणारे यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

**४)** त्याअर्थी मी, संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड तथा विशेष प्राधिकृत दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि.०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत जीवनावश्यक आणि अत्यावश्यक सेवेअंतर्गत होणारी वाहतुक तसेच नाशवंत पदार्थाची वाहतुक खेरीज करुन इतर वाहतुकीस प्रवेश निषिध्द करणे आणि निर्बंध घालणे अत्यावश्यक बनले आहे. त्यानुसार (अ) सर्व सार्वजनिक वाहतुकीची वाहने त्यामध्ये पीएमपीएमएल बसेस सह इतर सार्वजनिक वाहनांना तसेच (ब) प्रवासी वाहतुक पुरविणा-या सर्व शहराअंतर्गत आणि आंतरराज्य व राज्याअंतर्गत बसेस तसेच (क) प्रवासी वाहतुक सेवा पुरविणा-या सर्व खाजगी वाहनांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात प्रवेश करण्यास मनाई राहील. तसेच कोणत्याही व्यक्तीला पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातातील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली याठिकाणी सायकल तसेच पारंपारिक व अपारंपारिक इंधनावर चालणा-या मोटार सायकल, स्कुटर (गिअर सह/ शिवाय) सर्व प्रकारची वाहतुक करणारी तीनचाकी वाहने, हलकी वाहने, मध्यम वजनाची वाहने, जड व अवजड वाहने वाहतुकीची वाहने यांची वाहतुक व त्यामधुन प्रवास करण्यास मनाई करणारा आदेश **दिनांक ०१/०४/२०२० चे ०० :०१ वा. ते दिनांक १४/०४/२०२० चे २४/०० वा. दरम्यान लागु केला आहे.** सदर आदेशास उपरोक्त राज्य शासनाच्या लॉकडाऊन आदेशान्वये मुदतवाढ देवुन **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक ३०/०४/२०२० चे २४ : ०० वा. पर्यंत वाहतुकीस मनाई आदेश लागु करण्यात येत आहे.**

या आदेशाने सार्वजनिक व खाजगी प्रवासी वाहनांना वाहतुकीस मनाई करण्यात येत आहे.

५) **सदर आदेश खालीलबाबतीत लागु होणार नाहीत.**

- पोलीस व आरोग्य विभाग तसेच आपत्ती निवारण व्यवस्थापनाशी संबंधित (फक्त कर्तव्यार्थ)
- तातडीची रुग्णवाहतुक व हॉस्पीटलमधील डॉक्टर व पॅरामेडिकल स्टाफ , आरोग्यसेवा (फक्त कर्तव्यार्थ) इंडीयन रेड क्रॉस सोसायटी आरोग्य सेवा
- तात्काळ वैदयकीय उपचार आवश्यक असलेल्या रुग्णांना व प्रवाशांना
- अत्यावश्यक सेवा (उदा. वीज, पाटबंधारे/पाणी पुरवठा, दुरसंचार, अग्निशमन, बँक व एटीएम, विमा, इन्शुरन्स,फिनटेक सर्व्हिसेस आणि संबंधित सेवा, प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया, टेलीकम्युनिकेशन्स्, इंटरनेट,सेवा, आय टी आणि फक्त आय टी संलग्न सेवा ( अत्यावश्यक सेवेसाठी )वृत्तपत्र व वृत्तपत्र वितरण साखळी, पोस्टल इंटरनेट आणि डाटा सर्व्हिसेस संबंधित उद्योग - Critical National Infrastructure (फक्त कर्तव्यार्थ व तातडीचे असल्यास)
- जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा पुरविणारे तसेच जिवनावश्यक व अत्यावश्यक वस्तुंची वाहतुक करणारी वाहने (वाहन चालक आधिक एक व्यक्ती)
- जिवनावश्यक मालाचे उत्पादन होणा-या ठिकाणावरुन ते घाउक व किरकोळ विक्रेत्यांपर्यंत वाहतुक करणारे वाहन/चालक/हमाल यांना शहराअंतर्गत/ जिल्हयाअंतर्गत/राज्य व केंद्रशासीत प्रदेशाअंतर्गत, तसेच जीवनावश्यक माल व अत्यावश्यक मालवाहतुक करणारी वाहने आणि याव्यतिरिक्त मालवाहतुक व रिकाम्या माल वाहतुक करणा-या वाहनांना तसेच राज्याअंतर्गत शेतमाल व शेती मालाशी संबंधित उत्पादने जनावरांचा चारा/बि बीयाणे/कीटकनाशके यांची आयात व निर्यात
- आंतरराज्य मालाची / कारगोची निर्यातीसाठीची वाहतुक, राज्यांतर्गत आणि आंतरराज्य शेती माल, शेती संबंधित यंत्रसामुग्री, कापणी यंत्र, पेरणीयंत्र, आणि शेती व शेती फळबागा संबंधित साधने यांची वाहतुक.
- ई - कॉमर्स वाहतुकी अंतर्गत अत्यावश्यक माल त्यामध्ये फार्मास्युटिकल्स् आणि वैदयकीय उपकरणे
- खादय पदार्थ विक्री किराणा माल, दुध व दुग्धजन्य पदार्थ, ब्रेड, फळे, भाजीपाला, अंडी, मटण, मासे यांची वाहतुक आणि कोवारगृहे/ गोदामे यांचेपर्यंत व पासुनची वाहतुक
- बेकरी आणि पाळीव प्राण्यांसाठीच्या पशु वैदयकीय आस्थापना
- रेस्टॉरंटमध्ये बनविलेले खादयपदार्थ टेक अवे आणि होम डिलिव्हरीसाठी पार्सल पध्दतीने
- दवाखाने, औषधालये, चष्मा दुकाने, फार्मास्युटिकल्स् मॅन्युफॅक्चरिंग, स्वच्छतेशी निगडीत उदा. हॅंडवॉश, साबण,शांपु, जंतुनाशक, बॉडीवॉश, सरफेस क्लिनर, डीटरजंट, टीश्युपेपर, टुथपेस्ट, सॅनीटरी पॅड, डायपर यांसारखी उत्पादने आणि त्याचे वितरक यांना वाहतुकीसाठी
- पेट्रोल पंप, एल पी जी गॅस, ऑईल एजन्सीस्, बॅटरी सेल चार्जर्स आणि त्यांची गोदामे आणि तत्सम वाहतुक, महामार्गावरील पेट्रोलपंपवरील व नजीकची ट्रक दुरुस्तीची दुकाने,
- अत्यावश्यक सेवेस सुरक्षा आणि सेवा सुविधा पुरविणा-या संस्था
- कोव्हिड - १९ ला प्रतिबंध करण्यासाठी अत्यावश्यक सेवांचा पुरवठा करणा-या खाजगी आस्थापना
- प्रसारमाध्यमे व त्यांचे प्रतिनिधी (फक्त कर्तव्यार्थ )
- सामाजिक हेतुने वृद्धाश्रम/निराधार/अपंग/जेष्ठ नागरीक/एकाकी व्यक्ती यांना संस्थेच्या माध्यमातुन पुरविल्या जाणा-या अत्यावश्यक वैदयकीय सेवा व भोजन सेवा
- वर नमुद उल्लेख केलेल्या अत्यावश्यक सेवांची पुरवठा करणारी साखळी
- परवानाप्राप्त ऑटो रिक्षा त्यामध्ये एक चालक अधिक एक प्रवासी यांना फक्त अत्यावश्यक सेवेसाठी वाहतुक व प्रवासी वाहतुक करता येईल.
- माझ्यावतीने व जिल्हाधिकारी, पुणे यांनी परवानगी दिलेल्या व्यक्ती

**टिप** - १. वर नमुद प्रमाणे सवलत दिलेले अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांना त्यांचे निवासस्थान ते कार्यालय तसेच त्यांचे कर्तव्य बजावण्यासाठी आवश्यकतेनुसार शहरातील इतर मार्गावर वाहन वापरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे त्यासाठी त्यांनी त्यांचे ओळखपत्र, निवासस्थान व कार्यालय

याबाबतचा पुरावा सोबत बाळगणे बंधनकारक राहिल.

२. पेट्रोल पंप चालकांनी वर नमुद अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे ओळखपत्र व कार्यालय याबाबतचा पुरावा तसेच वाहनांच्या कागदपत्रांचा पुरावा तपासुन त्यांच्या वाहनांना आवश्यकता असेल त्यावेळी इंधन पुरवठा करावा.

३. कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी नेमणुक केलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्याबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

४. वरील संबंधित व्यवस्थापनांनी तसेच पुरवठा साखळीतील आत्यावश्यक सेवा पुरविणा-यांनी त्यांच्या एकुण कर्मचा-यांपैकी कर्तव्यार्थ कर्मचा-यांची संख्या मर्यादित ठेवणे बंधनकारक आहे. तसेच त्यांना इ-पास/ओळखपत्र दयावे. तसेच त्यांची नियमित आरोग्य व स्वच्छतेबाबत तपासणी करावी व त्यांना स्वसुरक्षिततेसाठी योग्य प्रोटेक्टिव्ह गीअर पुरवावेत.

५. रुग्ण वाहतुकीवेळी संबंधित रुग्णांनी दवाखान्यातील उपचाराबाबतची कागदपत्रे सोबत बाळगावीत.

६. वरील सर्व नमुद अपवादात्मक व्यक्ती व आस्थापना यांना कर्तव्याखेरीज ही सवलत लागु होणार नाही.

६) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती व संस्था भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलीत कायदयांतील तरतुदींनुसार शिक्षेस पात्र राहील.

७) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि १४/०४/२०२० रोजी दिलेला आहे.**

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

**ठिकाण :- पिंपरी चिंचवड**
**दिनांक :- १४ /०४/२०२०**